ALUMNI ASSOCIATION

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ,
बारामती, जि.पुणे.

कार्यालयः द्वारा- प्राचार्य, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आवार, तांदुळवाडी रोड, बारामती, जि.पुणे. ४१३१०२
संपर्कः (०२११२) २२२४०५, २२३६३५, फॅक्सः (०२११२) २२२७२८

रजि.क्र. महा/२२०/२०१७/पुणे. स्थापनाः दि.०७/०२/२०१७

प्राचार्य डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर
सचिव

श्री.जवाहर मोतीलाल शाह(वाघोलीकर)
अध्यक्ष

जावक क्र. दिनांकः

## Policy Document for Alumni Association

The Alumni Association aims to foster students' lifelong commitment to the organisation and enhance their well-being. Alumni Association strives to developing connections among alumni and institute to strengthen their commitment. "Alumni meet" that is organized by the Alumni Association provides a platform to share their views and support for the institution. It helps to bring new technologies and build professional relations with industry.

The Alumni Association was registered under the Societies, Act, 1860, with registration number MAHA/220/2017/Pune, dated on 7th February, 2017.

1) The Alumni Association Body is formed whose Executive Committee members look after the activities organized under this Cell. This committee have their meetings on regular basis. And keep the reports/documents also.
2) The executive council meeting of the association is organised once in a year to discuss future plan on the working of association and consider the financial status of the association.
3) The planning of alumni meet is done in the executive council meeting. The account of association is audited by CA and the auditor's statement of each financial year is submitted to the concerned authority.
4) The students of the institute are encouraged to be a part of alumni association by accepting the membership of the association.
5) The Alumni Association has given consent to the Alumni Association committee to organizing the meeting and the various activities at the college level..
6) The Alumni meet is conducted by the institute once in a year.
7) The students who have completed their graduation or post graduation, he or she can be a member of the Alumni Association.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE ★ BARAMATI

8) The fee for the life time membership for students is Rs.500/- and for one year membership the registration amount is Rs.100/- only.

9) The meritorious alumni are invited to share their experiences with the current year students. They are motivated through their first hand experiences.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**Secretary**

**Alumni Association**

शा.फो.झिं.मु.,पुणे-सीए-१९८/(५०० पुस्तके)१०-१३

[विशेष-घ. आ. (मुं. सा. वि.) ५०-म.

No. 40794

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

(१८६० चा अधिनियम, २१)

नोंदणी क्रमांक महा./ 220 /2017/पुणे
दिनांक 7/2/2017/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, "तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ" टि.सी. कॉलेज कॅम्पस मालमत्ता क्र 7053, तांदुळवाडी रोड, बारामती पुणे.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम, २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

श्री. विद्याधर दिगंबर महामुनी.

तारीख :- 7/2/२०17 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society Pune Region, Pune

8/2/17

संस्थांचे सहायक निबंधक,

सहायक संस्था निबंधक विभाग.
पुणे विभाग, पुणे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

महा./ 220 /2017/पुणे
दिनांक 7/2/2017/पुणे
सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

परिशिष्ट " ब "

ज्ञापन

१. संस्थेचे नाव : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ
२. संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता : द्वारा: प्राचार्य, अनेकांत एज्युकेशन सोसायटी, टि.सी. कॉलेज कॅम्पस, मालमत्ता क्र.१०५३, तांदुळवाडी रोड, बारामती, जि.पुणे.

अर्ज क्र. 5019/22
अर्जदाराचे नांव :- ग्रंथपाल टी.सी. कॉलेज
नक्कलेचा अर्ज आला तो दिनांक 28/06/2022
नक्कल तयार दि.:-
नक्कल दिली तो दि. 01/07/2022

३. संस्थेचे उद्देश :

१. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील माजी विद्यार्थी यांचे एकत्रिकरण करणे. त्यांचे मध्ये एकोपा, मैत्रीभाव तसेच त्यांचे प्रश्न सोडविणे.

२. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील माजी विद्यार्थी यांचा अनुभव, वेळ व ज्ञानाचा उपयोग महाविद्यालयातील विद्यमान विद्यार्थ्याकरीता करणे.

३. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील माजी तसेच विद्यमान विद्यार्थी तसेच अन्य गरजु मुलांना व्यवसाय वा नोकरीकामी वेळोवेळी मार्गदर्शन तसेच सहाय्यता करणे. त्याकामी त्यांना प्रशिक्षण देणे.

४. संस्थेमार्फत विविध उपलब्ध संधींची विद्यार्थ्यांना माहीती वा मार्गदर्शन करणे. त्यासाठी स्नेह मेळावे, शिबीरे आयोजित करणे.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.
01.07.2022

५. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी व महाविद्यालय प्रशासन यांचे मध्ये दुवा म्हणुन काम करणे, त्यांना मदत करणे.

६. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गरीब व गरजु माजी अथवा विद्यमान विद्यार्थी तसेच विद्यार्थीनींना गरजेनुसार आर्थिक वा अन्य स्वरूपात मदत करणे. त्यांना प्रोत्साहन देणे.

७. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व शिक्षक यांचे मध्ये स्नेह मेळावा आयोजित करून कला क्षेत्राशी संबंधीत संधीबाबत चर्चा घडवुन आणणे.

८. संस्थेमार्फत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील माजी अथवा विद्यमान विद्यार्थी यांचे करीता अभ्यासासाठी अभ्यासिका, पुस्तकपेढी, वाचनालय, ग्रंथालय सुरू करणे.

९. संस्थेमार्फत विविध शैक्षणिक संस्था सुरू करणे. संस्थेमार्फत वसतिगृह सुरू करणे.

१०. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना सुरू करणे. स्पर्धा मार्गदर्शन वर्ग सुरू करणे. व्यक्तीमत्व विकास कार्यक्रम राबविणे. वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

११. भरतीपुर्व पोलीस प्रशिक्षण संस्था वा मार्गदर्शन वर्ग सुरू करणे. विविध विषयांवर आधारीत संशोधन व प्रशिक्षण संस्था सुरू करणे. निरक्षरता निर्मुलनासाठी साक्षरतेचा पुरस्कार करणे.

१२. संस्थेमार्फत आरोग्यविषयक विविध कार्यक्रम आयोजित करणे. नेत्रदान, रक्तदान, कुटुंब नियोजन, महिला दक्षता, व्यसनमुक्ती, रोगनिराकरण, स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीर, निसर्गोपचार, आयुर्वेदिक, शववाहिका, रूग्णवाहिका, ब्लड बॅंक, धमार्थ दवाखाना सुरू करणे, तसेच एडस निर्मुलन व्याख्यानमाला, परिसंवाद तसेच अद्यावत रूग्णालय सुरू करणे त्यामार्फत आरोग्य सुविधा पुरविणे. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीग्रस्तांना दिलासा व मदत करणे.

१३. सर्व प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रिय कार्यक्रम व उत्सव साजरे करणे.

१४. संस्थेमार्फत शेती विषयक प्रदर्शन व शिबीर आयोजित करणे. सामाजिक वनीकरण विषयक योजनेबाबत जनजागृती करणे. कृषी विषयक सर्व योजनेबाबत मार्गदर्शन करणे. तज्ञांचे मार्गदर्शन करणे, प्रात्यक्षिके देणे. शेती पुरक व्यवसायाचे मार्गदर्शन करणे. बी बियाणे विषयी माहिती देणे व माहिती पुरवणे. शेतकरी मार्गदर्शन केंद्रांची निर्मिती करणे, हेल्पलाईन सुरू करणे. कृषी तंत्रज्ञान अवगत करून देणे, कृषी विकासासाठी कृषी विज्ञान केंद्र स्थापन करणे. सामाजिक वनीकरणाचे महत्व पटविणे. पर्यावरण विषयक संरक्षण व संवर्धनात्मक कार्यक्रम आयोजित करणे. स्वच्छतेचे महत्व पटवुन देणे, जनजागृती करणे. बचत गटांना मार्गदर्शन करणे. विविध कायदेविषयक जनजागृती करणे, कायदेनिषयक शिबीर आयोजित करणे.

१५. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील शिक्षक वा शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उल्लेखनिय कार्याबद्दल वा अन्य सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, व्यवसायिक व वैद्यकिय क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्यांना व्यक्तींना पुरस्कार देणे. व्याख्यानमाला आयोजित करणे.

१६. युवकांमध्ये सर्व खेळांची व व्यायामाची आवड निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षण देणे. खेळाचे व व्यायामाचे साहीत्य उपलब्ध करून देणे, विविध स्पर्धा आयोजित करणे.

१७. अद्यावत व्यायामशाळा सुरू करणे. हास्यक्लब, योगशिबीर आयोजित करणे.

१८. राष्ट्रिय, राज्यस्तरीय, जिल्हा, शहर व गाव पातळीवर खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे.

१९. राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी समता, बंधुत्व व सामंजस्य राखण्यासाठी राष्ट्रीय सण साजरे करणे. सामाजिक, सांस्कृतिक एकात्मता जोपासण्यासाठी कार्य करणे. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी साजरे करून लोकांमध्ये देशभक्ती जागृत करणे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

४. संस्थेचे नाव तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ या संस्थेच्या नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेचा कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे, पत्ता, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नाव व पत्ता | पद | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. जवाहर मोतीलाल शहा<br>धवलगिरी, सिनेमारोड, बारामती, जि.पुणे | अध्यक्ष | ७२ | व्यापार | भारतीय |
| २ | श्री. अविनाश दौलतराव रणसिंग<br>सुयोजण अपार्टमेंट, आमराई, बारामती, जि.पुणे | उपाध्यक्ष | ५८ | पत्रकारीता | भारतीय |
| ३ | प्रा. डॉ. श्री. चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर<br>मधुबन, संभाजीनगर, भिगवण रोड, बारामती,जि.पुणे | सचिव | ५९ | नोकरी | भारतीय |
| ४ | प्रा. श्री. निरंजन रमेश शहा<br>डॉ. करवा समोर, मारवाडपेठ, फलटण, जि.सातारा. | खजिनदार | ३६ | नोकरी | भारतीय |
| ५ | श्री. दिलीप रामचंद्र शिंदे<br>अंजू अपार्टमेंट, हरिकृपानगर, बारामती, जि.पुणे | सदस्य | ५४ | पत्रकारीता | भारतीय |
| ६ | प्रा. श्री. मारूती केरबा कोकरे<br>हनुमाननगर, पणदरे, ता. बारामती, जि. पुणे. | सदस्य | ५६ | नोकरी | भारतीय |
| ७ | श्री. अभिनंदन भरतलाल शहा<br>गुणवडी, ता.बारामती, जि.पुणे | सदस्य | ५० | नोकरी | भारतीय |
| ८ | प्रा. श्री. शिवाजी जगन्नाथ साठे<br>एम.आय.डी.सी. गेस्ट हाऊस जवळ, सुर्यनगरी, बारामती. | सदस्य | ५७ | नोकरी | भारतीय |
| ९ | श्री. विद्याधर दिगंबर महामुनी<br>सरस्वती, विवेकानंदनगर, बारामती, जि.पुणे. | सदस्य | ६७ | पेन्शनर | भारतीय |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव
श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर

५. आम्ही खालील सही करणार **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ** या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ** ही संस्था दिनांक २६/०१/२०१७ रोजी स्थापन केलेली असुन ती नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केलेल्या आहेत.

| अ.क्रं. | नाव व पत्ता | सही |
|---|---|---|
| १ | **श्री. जवाहर मोतीलाल शहा**<br>धवलगिरी, सिनेमारोड, बारामती, जि.पुणे | |
| २ | **श्री. अविनाश दौलतराव रणसिंग**<br>सुयोजण अपार्टमेंट, आमराई, बारामती, जि.पुणे | |
| ३ | **प्रा. डॉ. श्री. चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर**<br>मधुबन, संभाजीनगर, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे | |
| ४ | **प्रा. श्री. निरंजन रमेश शहा**<br>डॉ. करवा समोर, मारवाडपेठ, फलटण, जि.सातारा. | |
| ५ | **श्री. दिलीप रामचंद्र शिंदे**<br>अंजू अपार्टमेंट, हरिकृपानगर, बारामती, जि.पुणे | |
| ६ | **प्रा. श्री. मारूती केरबा कोकरे**<br>हनुमाननगर, पणदरे, ता बारामती जि पुणे | |
| ७ | **श्री. अभिनंदन भरतलाल शहा**<br>गुणवडी, ता.बारामती, जि.पुणे | |
| ८ | **प्रा. श्री. शिवाजी जगन्नाथ साठे**<br>एम.आय.डी.सी. गेस्ट हाऊस जवळ, सुर्यनगरी, बारामती. | |
| ९ | **श्री. विद्याधर दिगंबर महामुनी**<br>सरस्वती, विवेकानंदनगर, बारामती, जि.पुणे. | |

वरील विधानपत्रावर सहया करणाऱ्या इसमांना मी ओळखतो त्यांनी माझे समक्ष सहया केल्या आहेत

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** २६/०१/२०१७

**ADV. SACHIN D. TAKALE**
A/2, Vishvakumud Society, 1st Floor,
Near ...di Ganpati, 525, Narayan Peth,
Pune - 30. Mobile - 9922607070
Enr. No. MAH/2002/2004

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणपत्र देण्यात येते की, आमचे उत्तम माहिती प्रमाणे **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ** या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था बारामती, ता.बारामती, जि.पुणे या गावात, ठिकाणी वा महाराष्ट्र राज्यात नोंदणी अधिनियमान्वये अस्तित्वात नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

## परिशिष्ट क

### तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ
### या संस्थेची नियम व नियमावली

क्र. / 220 /2017/पुणे
दिनांक 7/2/2017/पुणे

१. **नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :**

अ) 'संस्था' याचा अर्थ, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ ही संस्था असा समजावा.

ब) अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व कार्यकारीणी सदस्य म्हणजे तुळजाराम चतुरचंद **महाविद्यालय माजी विद्यार्थी** संघ या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व कार्यकारीणी सदस्य समजावे.

क) सभासद म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक ४ नुसार **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ** या संस्थेचा सभासद समजावा.

ड) **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय** याचा अर्थ अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती या संस्थेचे **तुळजाराम चतुरचंद** महाविद्यालय, **बारामती, जि.पुणे** हे महाविद्यालय समजावे.

२. **कार्यक्षेत्र** : संस्थेचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्र राज्य राहील.

३. **हिशेबाचे वर्ष** : संस्थेचे हिशोबाचे वर्ष हे १ एप्रिल रोजी सुरू होऊन प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला समाप्त होईल.

४. **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पद्धत :**
संस्थेचे ध्येय, उद्देश व नियमावली मान्य असणाऱ्या १८ (अठरा) वर्षावरील **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय** बारामती जि.पुणे या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी वा विद्यार्थीनिस सभासद करून घेता येईल. सभासद होण्यास कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या अर्जाप्रमाणे अर्ज भरून विहीत केलेली फी/वर्गणी भरून सभासदत्व प्राप्त करून घेता येईल. संस्थेच्या सभासदत्वासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची योग्य छाननी करण्यांत येईल, कार्यकारी मंडळाने बहुमताने त्यांस मान्यता दिल्यावर अध्यक्षांचे मंजुरी स्वाक्षरी नंतर त्यांस संस्थेचा सभासद करून घेण्यांत येईल. अशा रितीने नियमावलीतील नियमांच्या अधिन राहुन सभासदत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांचे नांव संस्थेच्या सभासद नोंदवही मध्ये नोंदविण्यांत येईल. कार्यकारी मंडळाचा निर्णय सर्व मान्य राहील. ठरावान्वये या संस्था स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरूपी/आजीव सभासद समजले जातील. नियमावलीतील नियम सदर क्रमांक ४ मधील तरतुदींच्या अधिन राहुन नुसार मतदानाचा व निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार सभासदाला असेल.

सभासदत्वासाठी आलेला अर्ज कारण न देता नाकारण्याचा अधिकार विद्यमान कार्यकारी मंडळाला असेल. एकदा अर्ज नाकारल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा २ महीने कालावधी पर्यंत अथवा कार्यकारीणीच्या पुढील बैठकी पर्यंत अर्ज करता येणार नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

५. **सभासदत्व रद्द होणेबाबत** : खालीलप्रमाणे नमुद केलेप्रमाणे अनेक कारणांनी सभासदत्व रद्द होऊ शकते.

१. नियमानुसार वर्गणी न दिल्यास किंवा सलग ३ महिने फी न भरल्यास सभासदत्व रद्द करणेत येईल.

२. सभासदाची वर्तुणुक/वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल, ज्ञापन/नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करीत असेल, निर्घुण कृत्य केल्यास, संस्थेस हानी/नुकसान होईल, अप्रतिष्ठा दुर्लौकीक होण्यास कारणीभुत ठरेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल. अफरातफर अथवा संस्थेची फसवणुक केल्यास, संस्थेविषयी अपप्रचार केल्यास अथवा संस्थेस तोषिस लागेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.

३. फौजदारी खट्ल्यांत दोषी ठरून कायदेशीर शिक्षापात्र ठरल्यास, कायद्यानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासदत्व रद्द करण्यात येईल.

४. संस्थेचे काम करण्यास कायदेशीर अपात्र ठरविले असल्यांस, लेखी स्वरूपात राजीनामा दिलेला असेल आणि राजीनामा मंजुर झाला असेल तर सभासदत्व रद्द करणेत येईल.

५. शारीरीक/मानसिक दृष्टया संस्थेचे काम करण्यास असमर्थ असल्यास, मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्व रद्द करणेत येईल.
सभासदत्व रद्द करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

६. **सभासदांचे प्रकार** : या नियमावलीतील नियम क्रमांक ४ चे अधिन राहुन सभासदांचे खालीलप्रमाणे एकुण २ प्रकार असतील.

१. **आजीव सभासद** : संस्थेचे कार्यकारी मंडळाकडे आजीव सदस्याकरीता केलेल्या अर्जास मंजुरी दिल्यानंतर आजीव सभासद फी **रूपये ५,००/– (अक्षरी रूपये पाचशे मात्र)** भरणाऱ्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी वा विद्यार्थीनिस संस्थेचा आजीव सभासद म्हणुन संबोधले जाईल. सदर सभासद फी भरल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासुन त्या व्यक्तीस आजीव सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. ठरावान्वये या संस्था स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे माजी विद्यार्थी हे आपोआपच संस्थेचे आजीव सभासद समजले जातील. आजीव सभासदांना मतदानाचा तसेच निवडणुकीस उमेदवार म्हणुन उभे राहण्याचा अधिकार असेल.

२. **पदसिध्द सभासद** : **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय** बारामती जि.पुणे या महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राचार्य शिफारस करतील ते तीन प्राध्यापक यांना संस्थेचे पदसिध्द सभासद म्हणुन घेता येईल. अशा सभासदांना कोणत्याही प्रकारची फी नसेल तसेच अशा सभासदांना आजीव सभासदत्वाचा दर्जा प्राप्त होणार नाही. असे सभासद संस्थेत नोकरीस असे पर्यंतच कार्यकारी मंडळावर पदसिध्द सभासद म्हणुन घेतले जातील.

७. **वार्षिक सर्वसाधारण सभा व तिची कार्ये** :
वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतिम निर्णय देणारी सभा समजली जाईल. ही सभा वर्षामध्ये माहे एप्रिल ते जुलै या कालावधीतच घेतली पाहीजे. या सभेत सर्वप्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील. सभेचे स्थळ, दिनांक,वेळ,गणसंख्या,अजेंडा या बाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

सर्वसाधारण सभेमध्ये इतर विषयांसोबत प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा घेतली जाईल.

१. सभेचे मागील इतिवृत्त वाचुन कायम करणे/मान्यता देणे.

२. कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कारभारावर नियंत्रण ठेवणे.

३. वार्षिक हिशोब/जमा खर्च मंजुर करणे.

४. पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५. वेळेवर येणाऱ्या ठरावांवर नियंत्रण ठेवणे, संस्थेपुढील गहन व महत्वाच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

६. सनदी लेखापालाची निवड करून त्याचे मानधन ठरविणे.

७. कार्यकारी मंडळाची निवड करणे.

८. संस्थेचे नावात व पत्यात बदल, ज्ञापन, नियम व नियमावलीतील दुरूस्ती इत्यादी बाबतीत विषय असेल तर त्यावर निर्णय घेणे.

८. **सर्वसाधारण सभा सुचना व गणसंख्या** :

सर्वसाधारण सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा याबाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सभेची सुचना किमान १५ दिवस अगोदर अध्यक्षांच्या संमतीने सचिवाने सर्वप्रकारच्या सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये वरील प्रमाणे माहीती तसेच सभेपुढील विषय नमुद करावेत. सभेची सुचना हस्तदेय किंवा डाकबुकावर सही नोंद घेऊन देता येईल अगर रजिस्टर टपालाने पाठविता येईल. एकुण सभासद संख्येच्या २/३ एवढे सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यांत येईल. पुरेशी गणसंख्या न जमल्यास तहकुब/स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. परंतु अशी सुचना अजेंडयावर/सभेच्या नोटीसीवर नमुद असणे आवश्यक आहे.

९. **विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये** :

विशेष सर्वसाधारण सभा आवश्यकते नुसार केव्हाही घेता येईल. जी कार्ये वार्षिक सर्वसाधारण सभा करू शकते अशी सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला असेल. संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळ आयोजित करेल. किंवा सभासद संख्येच्या ३/५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यास कार्यकारी मंडळाने तशी मागणी मिळाले पासुन ३० दिवसांचे आत विशेष सर्वसाधारण सभा बोलवतील/आयोजित करतील. विशेष सर्वसाधारण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकुण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल. सुचनेमध्ये वरील प्रमाण माहीती तसेच सभेपुढील विषय नमुद करावेत. पुरेशी गणसंख्या न जमल्यास त्याच विषयाच्या सदर तहकुब/स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेत घेण्यांत आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

१०. <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ व त्याची रचना</u> :
संस्थेचे कार्य, व्यवहार पाहणेसाठी कमीत कमी ०९ व जास्तीत जास्त ११ सदस्य मिळुन कार्यकारी मंडळ असेल. कार्यकारी मंडळात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राचार्य निवडतील शिफारस करतील ते ३ सन्माननीय सभासद असे एकुण ४ पदसिध्द सभासद राहतील. कार्यकारी मंडळात १. अध्यक्ष, २. उपाध्यक्ष, ३. सचिव, ४. खजिनदार हे पदाधिकारी राहतली व उर्वरीत कार्यकारी मंडळावरील सदस्य राहतील. पदाधिकारी हे कार्यकारी मंडळाचे सदस्यातुन निवड केले जातील. पदाधिकारी हे पदसिध्द सभासदामधुनपण निवड करता येईल. संस्था स्थापनेच्या वेळी असलेले ९ सभासद हे प्रथम कार्यकारी मंडळात नमुद कालावधीकरीता घेण्यात आलेले आहेत उर्वरीत २ सभासदांची रिक्त संख्या आवश्यकतेनुसार त्यावेळचे कार्यकारी मंडळ उर्वरीत कालावधीकरीता गरज असल्यासभरतील.

११. <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पद्धत</u> :
कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. निवडणुकीची पध्दत लोकशाही पध्दतीने गुप्तमतदान करून सर्वसाधारण सभेमध्ये दर ५ वर्षानी कार्यकारी मंडळ निवडले जाईल. कार्यकारी मंडळात वरील नियम क्रमांक १० नुसार पदाधिकारी निवडले जातील. पहील्या कार्यकारी मंडळाचे काम समाधानकारक असल्यास त्यांनाच पुन्हा संधी दिली जाईल परंतु त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल. पहिल्या कार्यकारी मंडळाची मुदत ३१ मार्च २०२२ पर्यंत राहील.

१२. <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये/जबाबदारी</u> :

अ) <u>अध्यक्ष</u> :
१. संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावली नुसार संस्थाहितार्थ चालवावे.
३. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या विविध शाखांवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाण—घेवाण करणे.
५. संस्थेच्या वतीने विविध करार करणे.
६. सभासदांचा राजीनामा मंजुर करणे बाबत अंतिम अधिकार अध्यक्षांना राहील.
७. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निर्णायक मत देण्याचा अधिकार अध्यक्षांनी बजवावा.
८. संस्था हितार्थ सर्व अंतिम अधिकार अध्यक्षांना असतील.

ब) <u>उपाध्यक्ष</u> :
१. संस्थेच्या अध्यक्षांचे आदेशांचे पालन उपाध्यक्षांनी करावे.
२. संस्थेच्या कार्यात अध्यक्षांना मदत करणे.
३. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत अध्यक्षांना असलेले सर्वाधिकार वापरून संस्थाहितार्थ संस्थेचे कामकाज चालवावे.
४. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.

क) <u>सचिव</u> :
१. सचिव यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
२. संस्थेच्या सर्व सभा आयोजित करणे, तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त, कार्यवृत्त हे इतिवृत्तनोंदवही मध्ये सुवाच्च अक्षरांत सुस्पष्ट लिहावे अथवा सभेची दिवशीच संगणकावर टाईप करून त्याची प्रिंट इतिवृत्तांचे रजिस्टरी चिटकवुन त्यावर सभेचे अध्यक्षांची सही घेणे.
३. संस्थेच्या नावे सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

४. विविध कार्यसुची तयार करावी.
५. संस्थेचे कर्मचारी म्हणुन विविध पदांवर नेमणुका करणे, नोकरीतुन काढुन टाकणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी नियम तयार करावेत, त्यांचेवर लक्ष ठेवणे.
६. संस्थेचे कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे.
७. संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाण—घेवाण करणे. आवश्यकतेनुसार अध्यक्षांच्या लेखी परवानगीने संस्थेचे रू. ५,०००/— पर्यंतची रक्कम आकस्मिक (पेट्टी कॅश) खर्चासाठी आपल्या हाती ठेवावी.
८. वार्षिक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवुन घेणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.
९. कार्यकारी मंडळाचे संमतीने किरकोळ नियम तयार करणे.
१०. संस्थेच्या मोठया खर्चाची बिले मंजुर करणे, मालमत्तेची देखरेख करणे.
११. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
१२. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारून संस्था हितार्थ कामकाज चालविणे.

ड) **खजिनदार :**

१. खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
२. वार्षिक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.
३. संस्थेच्या खर्चाची बिले मंजुर करणे, पावत्यांवर सहया करणे. मालमत्तेची देखरेख करणे. मोठया खर्चाची बिले सचिवांच्या संयुक्त सहीने मंजुर करणे. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासबंधीच्या नोंदवहया सुस्थितीत ठेवणे.
५. संस्थेच्या नावे जमा झालेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत अथवा दुसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नावे असलेल्या बॅंक खात्यात जमा करावी.
६. खजिनदाराने सभासदांची सुची करून त्यांचे वर्गणीचा हिशोब व्यवस्थित व अद्ययावत ठेवावा.
७. संस्थेच्या नावे वेळोवेळी येणाऱ्या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क, निधी, चिजवस्तु वगैरे स्विकाराव्यात आणि त्याबाबत छापिल अनुक्रमांकीत, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेल्या पावत्या द्याव्यात.
८. लेखापरीक्षकांनी काढलेल्या त्रुटींची त्वरीत पुर्तता करणे.

ई) **कार्यकारी सदस्य :**

१. सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगी नुसार आवश्यकते प्रमाणे मदत करावी.
२. सर्व सभांमध्ये उपस्थित राहणे.
३. संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
४. निवडणुकीत मतदान करणे.
५. संस्थेस सुयोग्य निर्णय घेण्यास/योग्य निर्णय पारीत करण्यांस मदत करणे.
६. संस्थेचे नाव, कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे कामी सर्वकामे करणे.

संस्थेच्या सर्व कामकाजासाठी/निर्णयासाठी कार्यकारी मंडळातील सर्व सभासद/विश्वस्त जबाबदार असतील.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

१३. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :**

१. कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभाराचे नियंत्रण व संचालन करेल.
२. कार्यकारी मंडळ संस्थेच्या सभांमध्ये पारीत झालेल्या सर्व ठरावांची पुर्तता करेल.
३. संस्थेच्या स्थावर/जंगम मालमत्तेवर लक्ष, देखरेख करणे. त्यांची विहीत नमुन्यात नोंद ठेवणे.
४. मा.सहाय्यक संस्था निबंधक/मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे विविध विवरण पत्रके, हिशोबपत्रके, रिपोर्ट विहीत वेळेत सादर करणे.
५. संस्थेच्या हितार्थ कोर्ट कचेरीचे कामकाज करणे, न्यायालयांत दावे दाखल करणे व संस्थेच्या हितामध्ये कामकाज करणे,जाहीरात देणे. संस्थेवर असलेल्या कायदेशीर बाबींची पुर्तता करणे.
६. संस्थेच्या हितामध्ये आवश्यक ते आदेश पारीत करणे व योग्य ती पुर्तता करणे. विविध सेवासंहितांसाठी करार करणे.
७. विविध रक्कमांची देवाण घेवाण करणे.
८. नियम व आवश्यतेनुसार सुचना देऊन सभांचे आयोजन करणे.
९. संस्थेच्या हितामध्ये आवश्यकतेनुसार नियम व नियमावलीच्या आणि उद्देशांच्या अधिन राहुन नियम/पोटनियम तयार करणे. आवश्यकतेनुसार त्यात बदल करणे.
१०. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी विविध शाखांना मान्यता देणे/काढुन घेणे,शाखा सुरू वा बंद करणे
११. तक्रारींची दखल घेणे, योग्य ते दिशानिर्देश देणे/माहीती देणे.
१२. हिशोबावर, जमा खर्चाच्या नोंदीवर नियंत्रण ठेवणे.
१३. आवश्यकतेनुसार स्थानिक समिती, उपसमिती नेमणे व काम पुर्ण होताच त्या बरखास्त करणे.
१४. सभासदत्वासाठी आलेल्या योग्य नमुन्यातील अर्जावर विचार करून निर्णय घेणे आणि अर्ज मंजुर/नामंजुर करणे.
१५. कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे बाबत/कार्यकाल पुर्ण झाला असल्यास नियमांनुसार तात्काळ कार्यवाही करणे. अचानक रिक्त झालेल्या पदांबाबत उरलेल्या कालावधीसाठी रिक्त पदे भरणे बाबत नियमांनुसार तात्काळ कार्यवाही करणे.
१६. संस्थेच्या कामकाजासाठी सेवकांची नियुक्ती करणे, त्यांना रितसर काढुन टाकणे.
१७. संस्था हितार्थ बहुमताने विविध निर्णय घेणे.

१४. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :**

१. कार्यकारी मंडळाची सभा दर ३ महिन्यातुन एकदा आयोजित करण्यात येईल.
२. कार्यकारी मंडळाच्या संमतीशिवाय/परवानगी शिवाय ठोस कारण नसतांना कार्यकारी मंडळाचा एखादा सभासद सतत ४ सभांना गैरहजर राहील्यास विहीत सुचना देऊन त्याचे कार्यकारी मंडळावरील सभासदत्व रद्द केले जाऊ शकते.
३. कार्यकारी मंडळाची सभा नियम व नियमावली नुसार घेत नसल्यास कार्यकारी मंडळातील १/३ सभासदांनी स्वतःचे सहीनिशी अध्यक्ष/सचिव यांचेकडे लेखी अर्ज करून सभा भरविण्याची मागणी केली पाहीजे. अथवा संस्थेच्या एकुण सभासद संख्येंच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी सदर मागणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहील. अध्यक्षांनी अशी सभा बोलवली नाही तर सचिवांकडे पुन्हा अर्ज केल्यास सचिवांनी सदर सभा आयोजित करावी. या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे पुर्ण अधिकार व नियम असतील. सदर सभांच्या सुचनेमध्ये **'मागणीची सभा'** असे नमुद असणे आवश्यक आहे. कार्यकारी मंडळाची मागणीची सभा भरवुन मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निर्णय घेतला पाहीजे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

१५. **कार्यकारी मंडळ व मागणीच्या सभेची सुचना व गणसंख्या** :

१. कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची लेखी सुचना सेक्रेटरी/सचिवाने कमीतकमी ७ (सात) दिवस अगोदर द्यावी. सभेची सुचना व अजेंडा रजिस्टर पोस्टाने, नोंद घेऊन हस्तदेय पाठविले जाऊ शकतात. तसेच सुचना कार्यालयाचे दर्शनी भागातील सुचना फलकावर लावण्यांत येईल.

२. सभेच्या सुचनामध्ये तारीख, वेळ, ठिकाण व विषय नमुद असेल.

३. कार्यकारी मंडळाच्या सभेत गणसंख्या (कोरम) ३/५ किंवा ७ (सात) पदाधिकाऱ्यांची असेल. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यांत येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. तसेच सभेतील निर्णय बहुमताने घेण्यांत येतील.

४. पण तशाच प्रसंगी अध्यक्ष यांना फक्त एक दिवसाची समक्ष सही घेवून नोटीस देवुन तातडीने सभा बोलवण्याचा अधिकार राहील. पोस्टाने वेळेवर पाठविलेली अगर यु. पी. सी. ने पाठविलेली नोटीस एखाद्या सभासदास मिळाली नाही तर त्यामुळे बोलावलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही.

५. विशेष प्रसंगी वेळेच्या अभावी एखाद्या तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सचिव हे अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यकारी मंडळाकडे लेखी मत मागवुन घेतील व मताधिक्क्यावरून तो ठराव अगर निर्णय सभेत झाला असे समजण्यात येईल.

१६. **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम** :

कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षांनी, वरील नियम क्रमांक ४, ६, १०, ११ चे अनुसार सर्वसाधारण सभेत केली जाईल. त्यासाठी कार्यकारी मंडळ निवडणुक अधिकारी नेमतील व निवड झालेले निवडणुक अधिकारी निवडणुकीचा निकाल जाहीर करतील. ज्यावर्षी निवडणुक असेल, त्यावर्षी वार्षिक सभेच्या नोटीसीमध्ये तसा उल्लेख करण्यात येईल व उमेदवारी अर्ज मागवणेत येतील. कार्यकारी मंडळाची निवडणुक वार्षिक सर्वसाधारण सभेत, उपस्थित सभासदांच्या मधुन बहुमताने गुप्त मतदान पद्धतीने होईल. कार्यकारी मंडळाची निवड झाल्यावर पहील्या ७ (सात) दिवसानंतर मावळते सचिव वा अध्यक्ष यांचे सहीने कार्यकारी मंडळाची पहीली सभा घेण्यांत येईल.

१७. **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत नियम:**

नियमावलीतील नमुद केलेल्या कारणावरून कार्यकारी मंडळातील रिक्त झालेली जागा भरावयाची असल्यास त्याबाबत कार्यकारी मंडळातील उर्वरीत सदस्य बहुमताने ती जागा/पद उर्वरीत कालावधीकरीता भरतील. याबाबत वरील नियम क्रमांक ४, ६, १०, ११ विचारात घेण्यांत येतील व नियोजित पदसंख्या पुर्ण करून घेण्यांत येईल व तसा बदल अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे विहीत नमुन्यात मान्यतेसाठी सादर करतील.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

१८. <u>संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग</u> :

सभासद फी, वर्गणी, अनुदान, बँकेचे व्याज, प्रवेश शुल्क, देणगी, बक्षिस, दान, संस्थेच्या मालमत्तेपासुन येणारे उत्पन्न हे उत्पन्नाचे प्रमुख स्तोत असतील. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व त्यासाठीच्या प्रशासनिक कामकाजासाठी त्याचा विनियोग करण्यांत येईल. तसेच संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व हितासाठी स्थावर मिळकत विकत घेणे, हस्तांतरीत करणे, कराराने घेणेचा हक्क आहे. परंतु अशा स्थावर/जंगम मालमत्तेचा/मिळकतीचा विनियोग संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठीच केला जाईल. आवश्यक त्या ठिकाणी मा. सहाय्यक/उप/सह धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे मंजुरी घेण्यांत येईल.

१९. <u>उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुद</u> :

१. संस्थेचे ज्या उत्पन्नाच्या साधनांतुन फंड अथवा निधी जमा केला जाईल त्यातुन संस्थेवर असलेली जबाबदारी खर्च वजा जाता राहीलेल्या रक्कमेपैकी शिल्लक रक्कमेतुन उद्देशात नमुद केलेल्या कारणांसाठी खर्च करण्यांत येईल.

**२. संस्थेच्या उद्देशांवर खर्च : ८५ टक्के          २. व्यवस्थापनावर खर्च १५ टक्के**

३. आवश्यकतेनुसार सदर खर्चाच्या प्रमाणांत कार्यकारी मंडळाच्या ठरावान्वये बहुमताने बदल केला जाऊ शकेल. मात्र ठरावा मध्ये याबाबतची ठोस कारणे नमुद करावी लागतील.

२०. <u>कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद</u> :

संस्थेला आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्ति/वित्तीयसंस्थे कडुन ठेवी घेण अगर कर्ज घेण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव बहुमताने मंजुर करावा लागेल. तद्नुसार संस्थेस हात उसनवार रक्कमा घेता येतील, कर्ज घेता येईल, ठेवी स्विकारता येतील, तारण/गहाण ठेवता येईल. मात्र या बाबत मा.सहाय्यक/उप/सह धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

२१. <u>**स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणेबाबतची तरतुद**</u> :

संस्थेच्या हितासाठी, उद्देशपुर्तीसाठी स्थावर मालमत्तेची खरेदी व विक्री करता येईल. सर्वसाधारण सभेमध्ये या बाबतचा ठराव बहुमताने पारीत करून त्याबाबत व्यवहार करता येईल. मात्र या बाबत मा. सहाय्यक/उप/सह धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे पुर्व परवानगी आवश्यक राहील.

२२. <u>**बँक खाते**</u> :

संस्थेजवळ असलेल्या ठेवी, शिल्लक असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक अथवा अनुसुचीत शेडयुल्ड बँक किंवा मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्यता दिलेल्या बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. बँकेचा व्यवहार, पैशाची देवाण घेवाण अध्यक्ष, सचिव व खजिनदार या पदाधिकाऱ्यांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने करणे आवश्यक राहील. संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाद्वारे करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल.

२३. <u>**सभासदांची यादी**</u> :

संस्थेच्या प्रत्येक प्रकारच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १५ नुसार तसेच संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील कलम १५ अन्वये अनुसुची '६' च्या नमुन्यात ठेवण्यात येईल. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम ४ नुसार व १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमांतील नियम ८ नुसार दरवर्षी संस्थेमध्ये नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण संबंधीत अनुसुची २ च्या नमुन्यात मा.सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयास पाठवावी लागेल.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 ★ PUNE ★

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

२४. **ज्ञापन, नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद :**

अ) संस्थेच्या विधानपत्रात (ज्ञापनामध्ये) फेरबदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदींप्रमाणे करता येईल.

ब) संस्थेच्या नियम व नियमावलीत दुरूस्ती, फेरबदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा झाल्यास वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकुण सभासदांच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव बहुमताने संमत करावा लागेल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे तरतुदींचे पालन करून आवश्यक बदल करता येईल.

क) कार्यकारी मंडळ अथवा संस्था सभासदांनी सुचविलेला नियम नियमावली दुरूस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदास सभेच्या नोटीसी सोबत पाठविण्यात येईल.

२५. **संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करण्याची तरतुद :**

अ) संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदींप्रमाणे करता येईल.

ब) वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकुण सभासदांच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव बहुमताने संमत करावा लागेल.

क) संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल कार्यकारी मंडळ अथवा संस्था सभासदांनी सुचविलेला दुरूस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदास सभेच्या नोटीसी सोबत पाठविण्यात येईल.

२६. **विसर्जन :**

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरील प्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन कळविण्यात येईल. याबाबत वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकुण सभासदांच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव बहुमताने संमत करावा लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देवाण घेवाण संबंधीचा व्यवहार पुर्ण करावा लागेल. संस्थेची जंगम/स्थावर मिळकत, मालमत्ता दुसऱ्या नोंदणीकृत संस्थेला दान/देणगी म्हणुन देता येईल. नोंदणी अधिनियम १८६० चे कायद्यातील कलम १३ व १४ प्रमाणे यासंबंधी कार्यवाही करण्यात पुर्ण करावी लागेल.

**" दाखला "**

असे प्रमाणित करण्यात येते की, **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, माजी विद्यार्थी संघ** या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही सत्य प्रत आहे.

**सही शिक्क्याची खरी नक्कल**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| श्री.जवाहर मोतीलाल शहा | श्री.अविनाश दौलतराव रणसिंग | डॉ.चंद्रशेखर वसंतराव मुरूमकर |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

स्थळ : पुणे

दिनांक : २८/०१/२०१७

01/07/22

01.07.2022

**अधिक्षक**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**

**मी नक्कल तयार केली**

**मी वाचली**

**मी रुजवात केली**